पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-8007269000
ईमेल नं.-jansampark.osd@gmail.com

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' गुरुवार' दि.29.10.2026

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.28 ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण 217 कारवाया करुन 1,15,250 ₹'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

स्थानिक गुन्हे शाखा: आरोपी नामे-पपीता रंजीत काळे, वय 45 वर्षे, रा.पापनास नगर धाराशिव ता. ह.मु. सारोळा(बु) ता. जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.27.10.2026 रोजी 16.40 वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर सारोळा येथे अंदाजे 5,500 ₹ किंमतीची 55 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-दत्तु नारायण देडे, वय 35 वर्षे, रा.साठेनगर सारोळा बु. ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.27.10.2026 रोजी 17.15 वा. सु.आपल्या राहत्या घराचे समोर अंदाजे 3,600 ₹ किंमतीची 36 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-हिराबाई रावसाहेब काळे, वय 60 वर्षे, रा. सकनेवाडी ता. जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.27.10.2026 रोजी 18.20 वा. सु.मसोबा मंदीरजवळ सकनेवाडी येथे अंदाजे 5,200 ₹ किंमतीची 52 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे स्वतंत्र 3गुन्हे नोंदविले आहेत.

भुम पोलीस ठाणे: आरोपी नामे-हिरा कल्याण पवार, वय 64 वर्षे, रा. गोष्टी गल्ली भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.28.10.2026 रोजी 10.15 वा. सु.एम.एस.ई.बी सबस्टेशन भुम जवळील मोकळ्या जागेत अंदाजे 1,000 ₹ किंमतीची 10 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-अमोल विक्रम धोत्रे, वय 38 वर्षे, रा.कैकाडे गल्ली भुम ता.भुम जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.28.10.2026 रोजी 18.00 वा. सु.गोलाईचौक भुम जवळ बाबर भेळचे पाठीमागे पत्र्याचे शेडमध्ये अंदाजे 12,000 ₹ किंमतीची 200 लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदविले आहेत.

आंबी पोलीस ठाणे: आरोपी नामे-बबन रामा मांगले, रा. हिंगणगाव ता. परंडा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.28.10.2026 रोजी 17.00 वा. सु. आपल्या राहत्या घराचे आडोशाला अंदाजे 980 ₹ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या 14 सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये आंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

मुरुम पोलीस ठाणे: आरोपी नामे-गुंडाया लक्ष्मया तेलंग, वय 48 वर्षे, रा. कनकनगर गुलबर्गा ह.मु. आष्टा मोड ता. लोहारा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.28.10.2026 रोजी 18.00 वा. सु. आष्टा मोडे येथे अंदाजे 8,000 ₹ किंमतीची 80 लिटर सिंधीताडी अम्ली द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

" जुगार विरोधी कारवाई."

लोहारा पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलीसांनी दि.28.10.2026 रोजी 14.20 वा. सु.

लोहारा पोलीस ठाणे हद्दीत पेठसांगवी गावचे वेशी जवळ छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-बिलाल दाउत पठाण, वय 38 वर्षे, रा.पेठसांगवी ता. उमरगा जि. धाराशिव हे 14.20 वा. सु. पेठसांगवी गावचे वेशी जवळ मिलन डे मटका जुगाराचे असा एकुण 850 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले लोहारा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

येरमाळा पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान येरमाळा पोलीसांनी दि.28.10.2026 रोजी 17.20 वा. सु. येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत तेरखेडा ते खमकरवाडी जाणारे रोडलगत दर्गा शेजारील गाळ्या समोर छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-विशाल भिमा कसबे, वय 27 वर्षे, रा.तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव हे 17.20 वा. सु. तेरखेडा ते खमकरवाडी जाणारे रोडलगत दर्गा शेजारील गाळ्या समोर कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 2,390 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले येरमाळा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

वाशी पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान वाशी पोलीसांनी दि.28.10.2026 रोजी 16.30 ते 18.40 वा. सु. वाशी पोलीस ठाणे हद्दीत 2 ठिकाणी छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-अरुण माणिक पवार, वय 40 वर्षे, रा.पारगाव ता.वाशी जि. धाराशिव हे 18.40 वा. सु.पारगाव शिवारात एनएच 52 रोडलगत कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 630 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले.तर आरोपी नामे-मुसा हुसेन लोहार, वय 56 वर्षे, रा.लोहारा गल्ली शिवाजीनगर वाशी ता.वाशी जि. धाराशिव हे 16.30 वा. सु.लोहारा गल्ली शिवाजीनगर वाशी येथे कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 550 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले वाशी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये वाशी पो ठाणे येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदवले आहेत.

"मद्यपी चालकावर गुन्हा दाखल."

आनंदनगर पोलीस ठाणे:आरोपी नामे-निलेश प्रभाकर माने, वय 33 वर्षे, रा. आझाद चौक धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.28.10.2026 रोजी 11.15 वा. सु. आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र एमएच 13 यु 4633 ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सांजा रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-185 मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

आनंदनगर पोलीस ठाणे:आरोपी नामे-निलेश प्रभाकर माने, वय 33 वर्षे, रा. आझाद चौक धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.28.10.2026 रोजी 11.15 वा. सु. आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र एमएच 13 यु 4633 ही छत्रपती शिवाजी महाराज चौक ते सांजा रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-185 मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

" मालमत्तेविरुध्द गुन्हे."

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-केसरबाई दामोदर गायकवाड, वय 79 वर्षे, रा.रमाबाई झोपडपट्टी सोलापूर ता. जि. सोलापूर ह.मु. तिर्थ खु ता. तुळजापूर जि.धाराशिव या दि.28.10.2026 रोजी 19.00 वा. सु.नविन बसस्थानक तुळजापूर येथे नळदुर्ग जाणारे बसमध्ये चढत असताना आरोपी नामे-मिना बजरंग जाधव, रा. मंजुनाथ नगर सोलापूर ता. जि. सोलापूर यानी केसरबाई गायकवाड यांचे गळ्यातील 44 सोन्याचे मणी पोत अडीच ग्रॅम वजनाचे 15,000 ₹ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-केसरबाई गायकवाड यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

येरमाळा पोलीस ठाणे : फिर्यादी नामे-अशोक बाबुराव बोराडे, वय 47 वर्षे, रा. गोटेगाव ता. केज जि. बीड यांची अंदाजे 25,000₹ किंमतीची होंडा शाईन कंपनीची मोटरसायकल क्र एमएच 44 ए.जे.5018 जिचा चेसी नंबर-me4jc85mctg इंजिन नंबर-jc85eg4346401 ही दि.11.10.2026 रोजी 04.00 ते 07.00 वा. सु. रत्नापुर पाटी येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अशोक बोराडे यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"रस्ता अपघात."

तुळजापूर पोलीस ठाणे : फिर्यादी नामे- संदीप लक्ष्मण उर्फ मारुती पवार, वय 29 वर्षे, व सोबत मयत नामे-मिलींद नामदेव जाधव, वय 21 वर्षे, रा. खंडाळा हे दोघे दि.18.10.2026 रोजी 15.15 वा. सु.मोटरसायकल क्र एमएच 25 ए.टी. 9056 वरुन जात होते. दरम्यान तुळजापूर ते लातुर जाणारे रोडवर वडगांव लाख पाटी येथे इनोव्हा कार क्र एमएच 13 सीके 0956 व ट्रॅक्टर क्र एमएच 25 ए.एल.2355 चा चालकांनी आपआपल्या ताब्यातील वाहने ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून संदीप पवार यांचे मोटरसायकलला पाठीमागून धडक दिली. या अपघातात मिलींद जाधव हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर संदीप पवार हे गंभीर जखमी झाले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संदीप पवार यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम 281, 125(अ)(ब), 106(1) सह कलम 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"फसवणुक."

कळंब पोलीस ठाणे :आरोपी नामे-तत्कालीन सरपंच सुवर्णा सुधाकर इंगळे,रा. शेळका धानोरा ता. कळंब, सुरेश तुकाराम धावारे, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी शेळाका धानोरा ता. कळंब रा. गणेश नगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.06.06.2023 रोजी 10.00 वा. सु ते दि. 07.07.2025 रोजी 18.00 वा. सु. ग्रामपंचायत कार्यालय शेळका धानोरा येथे संगणमत करुन 15 व्या वित्त आयोगाच्या साहित्य खरेदी नाली मेला/ नाली काम/ नालीतील गाळ काढणे सीसीटीव्ही चे काम शेतकरी सहलचे काम यावर खर्च दाखवून 14,13,163₹ किंमतीचा विनियोग सादर न करता अपहार करुन शासनाची फसणवुक केली आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनिषा वसंतराव सुकाळे, सहा गटविकास अधिकारी पंचायत समिती कळंब यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे कळंब येथे भा.न्या.सं.कलम 318(4), 316(4), 3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"मारहाण."

तुळजापूर पोलीस ठाणे :आरोपी नामे-क्रांती भिमराव कदम, वय 40 वर्षे, हर्ष दिपक कदम, वय 25 वर्षे,आदित्य दिपक कदम, वय 24 वर्षे, संदेश जितेंद्र कदम, वय 24 वर्षे, इतर 11 इसम यांनी दि.19.10.2026 रोजी 22.00 ते 23.00 वा. सु मातंगी मंदीराकडे जाणारे एक्झिटव गेटजवळ तुळजाभवानी मंदीराचे आवारात तुळजापूर येथे फिर्यादी नामे-बालाजी वसंतराव येवते, पोलीस निरीक्षक प्रभारी मंदीर चौकी तुळजापूर यांना व साक्षीदार हे तुळजाभवानी मंदीर नवरात्र महोत्सवानिमीत्त त्यांचे कर्तव्य करीत असताना नमुद आरोपींनी दारु पिवून तोंडात खर्रा व तंबाखु खावून मंदीर परीसरात थुंकत असताना फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यास बाहेर काढले या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन खुर्ची मारुन किरकोळ जखमी करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालाजी येवते यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 190,191(1), 191(2), 118(1), 132, 115(2), 296(बी), 221 सह कलम 116 मपोअ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"अपहरण."

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-बक्कारेड्डी विठ्ठलरेड्डी कोत्तदोड्डी, वय 40 वर्षे, रा.मुंगी न्यालकल ता. जहिराबाद जि. संगारेड्डी राज्य तेलंगणा यांचा मित्र नामे-कुंटागडी नरेश मानेन्ना, वय 40 वर्षे, रा. न्यालकल मंडल ता. जहिराबाद जि. संगारेड्डी राज्य तेलंगणा हे दि.24.10.2026 रोजी 16.00 वा. सु. समर्थ हॉटेल सिंदफळ शिवार येथुन कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी गुप्तपणे व गैरपणे परिरुध्द होणेसाठी अपहरण करुन घेवून गेले. अशा जकुराच्या फिर्यादी नामे-बक्कारेड्डी कोत्तदोड्डी यांनी दि.28.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 140(3) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस